शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd: 1962
NAAC "A" Grade

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004 MAHARASHTRA**
**Colleges and University Development Section**
PHONE :EPABX-2609000, 2609145
□ FAX :0091-231-2691533 & 0091-231-2692333
Website : www.unishivaji.ac.in E-mail: stats@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र(महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग)**
**दुरध्वनी: (ईपीएबीएक्स) २६०९०००, २६०९१४५**
□ **फॅक्स: ००९१-२३१-२६९१५३३,२६९२३३३,२६९३२९४**

जा.क्र. एस.यु/म.व.वि.वि.विभाग/१०२७ दिनांक : 1 MAR 2018

**प्रति,**
**मा.विभागप्रमुख / संचालक / समन्वयक**
सर्व अधिविभाग / अभ्यास केंद्रे
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय : साहित्य / उपकरण हस्तांतरणाबाबत.**

महोदय,

विद्यापीठ अधिविभागास तसेच अधिविभागातील शिक्षकांना विविध वित्तीय संस्थेकडून प्रकल्प मंजूर होवून निधी मंजूर होतो. सन २०१०-२०११ ते २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण मा. लेखापाल कार्यालयाकडील तपासणी पथकाकडून अधिविभागाची पहाणी केली आहे. सदर भेटीदरम्यान अधिविभागातील शिक्षकांना मंजूर झालेल्या प्रकल्पातून खरेदी करण्यात आलेले उपकरण / साहित्य व इतर अनुषंगीक साहित्य हे संबंधीत प्रकल्पाची मुदत समाप्तीनंतर अधिविभागास वर्ग केले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या वार्षिक ताळेबंद व वार्षिक अहवालामध्ये निर्देशित केलेल्या विविध बाबींची पूर्तता होत नाही व तसा अभिप्राय (Audit Para : Overstatement of Liabilities due to non-adjustiment of expenditure incurred on creation of assets. Non clearance / adjustment of Project grants.) दिलेला आहे.

तरी आपणास कळविण्यात येते की, ज्या शिक्षकांच्या प्रकल्पाचा कालावधी समाप्त झालेला असेल व संबंधीत शिखर संस्थेने प्रकल्पामधून घेतलेले उपकरण / साहित्याची शिखरसंस्थेकडे जमा करणेविषयी कळविले नसेल तर सर्व उपकरण / साहित्याची अधिविभागातील जडसंग्रह नोंद वहीत नोंद घेवून सदर साहित्याचे मुल्यांकन करुन त्याचा अहवाल योग्य त्या कार्यवाहीसाठी लेखा विभागाकडे पाठविण्याचा आहे. सदरची कार्यवाही प्रकल्प संपल्यावर लवकरात लवकर करण्याची आहे व त्याची माहिती या विभागास देण्याची आहे याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
**कुलसचिव**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सोबत : वरील प्रमाणे
प्रत माहितीसाठी :
(१) मा . वित्त व लेखाधिकारी कार्यालय (२) साठापडताळणी विभाग.